सोलापूर कृषि उत्पन्न बाजार समिती सोलापूर
श्री. सिध्देश्वर बाजार पेठ हैद्राबाद रोड सोलापूर
फोन नं. २३७४६७८

जा.नं. परिपत्रक / १२१४
दिनांक २३/७/२०२५

परिपत्रक

सोलापूर कृषि उत्पन्न बाजार समितीच्या श्री. सिध्देश्वर बाजार पेठ या मुख्य बाजार आवारातील नियंत्रित शेतीमालाची विक्री करणाऱ्या सर्व परवानाधारक आडते / व्यापारी यांना कळविण्यात येते की, महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम १९६३ यातील कलम ४, पोटकलम (३) व कृषि व सहकार विभागातील शासकीय अधिसूचना क्रमांक एपीएम २०८१/३६३४०/४४०/११सी दिनांक ५/९/१९८१ अन्वये मा. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था सोलापूर यांनी दिनांक २२/७/२०२५ रोजीच्या अधिसूचनेद्वारे रेशीम कोष, ड्रॅगन, जांभूळ, कच्चा खजूर, केव्ही, आलू बुखार, पेर, काळी मैना, बीट, बिन्स, तांदूळसा भाजी या नियंत्रित शेतीमालाची खरेदी विक्रीचे नियमन करण्यात आले असलेबाबतची अधिसूचना प्रसिध्द केली आहे.

बाजार समितीच्या श्री. सिध्देश्वर बाजार पेठ या मुख्य बाजार आवारात दिनांक २३/७/२०२५ पासून आवक जावक होणाऱ्या रेशीम कोष, ड्रॅगन, जांभूळ, कच्चा खजूर, केव्ही, आलू बुखार, पेर, काळी मैना, बीट, बिन्स, तांदूळसा भाजी या शेतीमालाचा नियंत्रित शेतीमालात समावेश करुन त्याप्रमाणे खरेदी विक्रीच्या व्यवहाराच्या नोंदी ठेवाव्यात.

तरी सर्व संबंधितांनी याची नोंद घ्यावी.

प्र. सचिव
बाजार समिती सोलापूर

Scanned with OKEN Scanner